दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा सांगली

# खेळाडुंनी मेजर ध्यानचंद यांचा आदर्श घ्यावा

## डॉ. संजय पाटील

जनप्रवास । प्रतिनिधी

इस्लामपूर : खेळावरची निष्ठा कशी असावी, याचे उत्तम उदाहरण म्हणून मेजर ध्यानचंद यांच्या चरित्राकडे पाहिले जाते. हॉकीसारख्या आव्हानात्मक खेळात ध्यानचंद यांनी अनेक विक्रम रचले आहेत. नव्या खेळाडुंनी त्यांचा आदर्श घेतला पाहिजे. खेळाडू म्हणून ते प्रतिभाशाली होतेच पण भारतीय नागरिक म्हणूनही ते उच्चप्रतीचे देशाभिमानी होते. हिटलर सारख्या हुकुमशहाने अमाप संपत्तीच्या मोबदल्यात जर्मनीच्या बाजूने खेळण्याचा दिलेला प्रस्ताव त्यांनी नाकारला होता, असे प्रतिपादन डॉ. संजय पाटील यांनी केले.



इस्लामपूर : कर्मवीर कॉलेजमध्ये राष्ट्रीय क्रीडादिनानिमित्त बोलताना संजय पाटील मंचावर डॉ. अरुण पाटील, डॉ. नितीन शिंदे, डॉ. अमित माने, डॉ. संदीप पाटील.

येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. प्राचार्य डॉ. अरुण पाटील कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिन प्रतिवर्षी क्रीडादिन म्हणून साजरा केला जातो. कॉलेजमध्ये बुद्धिबळ आणि हॉलीबॉल स्पर्धांचे आयोजन केले होते. बुद्धिबळ स्पर्धेत १४ खेळाडुंनी सहभाग नोंदवला. हॉलीबॉल स्पर्धेत कॉलेजमधील एकूण ५ संघांनी सहभाग नोंदवला. दोन्ही स्पर्धेतील गुणानुक्रमे ३ स्पर्धकांना डॉ. पाटील यांच्याहस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. प्राचार्य डॉ. अरुण पाटील म्हणाले, खेळाला अभ्यासाची जोड असली पाहिजे. शैक्षणिक प्रावीण्य खेळाडुंचे व्यक्तिमत्व परिपूर्ण बनवते. विद्यार्थ्यांनी कॉलेजमधील सुविधांचा लाभ घ्यावा. खेळासारख्या आव्हानात्मक क्षेत्रात मुलींनी मागे राहता कामा नये. वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ. नितीन शिंदे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संतोष पाटील प्रमुख उपस्थित होते. केंद्र शासनाच्या 'फिट इंडिया' योजनेंतर्गत खेळाडुंना यावेळी प्रतिज्ञा देण्यात आली. अजित पाटील यांनी संयोजन केले. डॉ. संदीप पाटील यांनी स्वागत केले. डॉ. अमित माने यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. सिमंतीनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. कमलेश ठाकरे यांनी आभार मानले.

पुण्य नगरी

# प्राचार्य अरुण पाटील यांनी कामाचा ठसा उमटवला

## एन. आर. पाटील

**इस्लामपूर / प्रतिनिधी**

कॉलेजच्या लौकिकात भर घालणारा कोणताही सेवक हा संस्थेसाठी भूषण असतो. तीन वर्षाच्या सेवाकाळात डॉ. अरुण पाटील यांनी प्राचार्य म्हणून खूप चांगले काम केले. आपल्या कामाच्या शैलीचा त्यांनी वेगळा ठसा उमटवला, असे प्रतिपादन अॅड एन. आर. पाटील यांनी केले.



**इस्लामपूर : प्राचार्य डॉ. अरुण पाटील यांचा सत्कार करताना अॅड. एन. आर. पाटील. सोबत उपप्राचार्य डॉ. नितीन शिंदे.**

येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्राचार्य डॉ. अरुण पाटील यांच्यासाठी स्टाफ अॅकॅडमीच्यावतीने आयोजित केलेल्या सदिच्छा समारंभात अध्यक्ष म्हणून ते बोलत होते.

डॉ. अरुण पाटील यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष अॅड. एन. आर. पाटील यांच्या हस्ते यावेळी वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांच्याकडे कॉलेजच्या प्रभारी प्राचार्यपदाचा कार्यभार सोपवण्यात आला. उपप्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांच्यासह कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. संतोष पाटील, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य अनिल पाटील, डॉ. एस. ए. कांबळे, शिक्षकेत्तर सेवक राजू ढोले यांनी मनोगत व्यक्त केले.

प्राचार्य डॉ. अरुण पाटील यांनी सत्काराला उत्तर दिले. तब्येतीच्या कारणास्तव आपण प्राचार्यपदाच्या जबाबदारीतून मुक्त होत असल्याचे त्यांनी सांगितले. संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य डी. बी. पाटील, प्रा. स्मिता पाटील, डॉ. मिलिंद देशमुख उपस्थित होते. प्रा. आर. एम. पाटील यांनी प्रास्ताविक आणि स्वागत केले. डॉ. सीमा परदेशी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. शीला लाड यांनी आभार मानले.

Smart Sangli Edition
May 3, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# कर्मवीर कॉलेजमध्ये महाराष्ट्र दिन उत्साहात

**इस्लामपूर / प्रतिनिधी**

येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये महाराष्ट्र दिन मोठया उत्साहात झाला. कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांच्याहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रगीत आणि महाराष्ट्र गीत गायन झाले.

डॉ. नितीन शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संतोष पाटील यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते. जिमखानाप्रमुख डॉ. अमित माने यांनी सूत्रसंचालन केले.